**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**राष्ट्रीय बातमीपत्र**
**सकाळी 09 वाजून 20 मिनिटं**

**दिनांकः15.07.2024** **वारःसोमवार**

---

**ठळक बातम्या**

पुण्याच्या लोहगाव विमानतळावरील नव्यानं उभारण्यात आलेलं टर्मिनल प्रवाशांच्या सेवेसाठी खुलं

मध्य प्रदेशातील सर्व 55 जिल्ह्यांमध्ये प्राईम मिनिस्टर कॉलेज ऑफ एक्सलंस चं उद्घाटन

DD-Robocon India स्पर्धेत पुण्यातील पिंपरी-चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालय, आणि एमआयटी विश्वशांती विद्यापीठाला पहिल्या तीन क्रमांकामध्ये स्थान

विम्बल्डन टेनिस स्पर्धेत पुरुष एकेरीत कार्लोस अल्काराझ विजयी

आणि
महाराष्ट्राच्या बहुतांश भागात कालही पावसाची संततधार, कोकणात आज अति मुसळधार पावसाचा इशारा

**पुणे विमानतळ**
गेल्या 10 वर्षांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात देशातल्या विमान वाहतूक क्षेत्रानं मोठी प्रगती केली असून जागतिक पातळीवर हे क्षेत्र तिसऱ्या स्थानावर पोहोचल्याचं केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी काल सांगितलं. पुण्याच्या लोहगाव विमानतळावरील नव्यानं उभारण्यात आलेलं टर्मिनल मोहोळ यांच्या प्रमुख उपस्थितीत

प्रवाशांच्या सेवेसाठी खुलं करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते. नव्या टर्मिनलवरून विमान प्रवास करणाऱ्या पहिल्या प्रवाशाला यावेळी मोहोळ यांच्या हस्ते बोर्डिंग पास देण्यात आला. आगामी काळात देशभरात आणखी 20 ते 25 नवीन विमानतळांची उभारणी केली जाणार आहे, असंही ते म्हणाले.

**अमित-शहा**
मध्य प्रदेशातील सर्व 55 जिल्ह्यांमध्ये विद्यार्थ्यांना उत्कृष्ट आणि उच्च दर्जाचं शिक्षण देण्यासाठी प्राईम मिनिस्टर कॉलेज ऑफ एक्सलंसचं उद्घाटन केंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते काल इंदूर इथं झालं. मुख्यमंत्री डॉक्टर मोहन यादव यावेळी उपस्थित होते. विद्यार्थ्यांना पुढील 25 वर्षासाठी जागतिक स्तरावरील स्पर्धेकरिता तयार करणं आणि भारताचा सांस्कृतिक वारसा तसंच विविध भाषांचं संवर्धन करण्यासाठी पुन्हा तयार करणं हा नवीन शैक्षणिक धोरणांचा उद्देश आहे. नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करणारे आणि आर्थिकदृष्ट्या वंचित कुटुंबातील मुलांना लाभदायक वैद्यकीय आणि अभियांत्रिकी अभ्यास हिंदीमध्ये सुरू केल्याबद्दल शहा यांनी मध्य प्रदेश सरकारचे कौतुक केलं.

**अनुयायी**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे एक्स या समाजमाध्यमावर 10 कोटी अनुयायी झाले आहेत. यामध्ये गेल्या 3 वर्षात 3 कोटी लोकांची भर पडली.  मोदींना आता X वर जगातील सर्वाधिक लोकप्रिय नेते होण्याचा मान मिळाला आहे.  अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडन यांचे एकंदर 3 कोटी 8० लाख 6 हजार तर कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रूडो यांचे 65 लाख अनुयायी आहेत. या माध्यमावरील चर्चा, वादविवाद, विचार, नागरिकांच्या शुभेच्छा आणि ग्राह्य धरावेत अशा टीका यांची दखल घेणं हा आनंददायी अनुभव असून भविष्यातही संवादाचं हे माध्यम असंच साथ देत राहील असं मोदी यांनी आपल्या X संदेशात म्हटलं आहे.

**परकीय-गुंतवणूक**
जलै महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात परकीय संस्थांनी 24 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक भारतीय भांडवली बाजारात केली आहे. गुंतवणूकदारांच्या अहवालात ही माहिती देण्यात

आली आहे. विदेशी गुंतवणूकदारांनी 15 हजार 352 कोटी रुपये समभाग विक्री आणि 8 हजार 484 कोटी रुपये कर्जाऊ बाजारात गुंतवले, ज्यामुळे 12 जुलैपर्यंत भारतीय भांडवली बाजारात निव्वळ गुंतवणूक 23 हजार 836 कोटी रुपये झाली. असल्याचं या अहवालात म्हटलं आहे.

**नेपाळ  पंतप्रधान**

नेपाळचे पंतप्रधान म्हणून के पी शर्मा ओली आज शपथ घेतील. काठमांडू इथल्या राष्ट्रपती भवनात ओली यांच्यासह त्यांच्या मंत्रीमंडळाला राष्ट्रपती राम चंद्र पौडेल पद आणि गोपनीयतेची शपथ देतील. गेल्या शुक्रवारी माजी पंतप्रधान पुष्पकमल दहल प्रचंड यांनी संसदेत विश्वासमत गमावल्यानंतर ओली यांनी सरकारस्थापनेचा दावा केला होता. त्यांना सरकार स्थापन करण्यासाठी नेपाळी काँग्रेसचे अध्यक्ष शेर बहादूर देऊबा यांनी पाठिंबा दिला आहे.

**DD-Robocon India**

प्रसारभारती आणि भारतीय तंत्रशिक्षण संस्था दिल्ली यांच्या वतीनं आयेजित DD-Robocon India 2024 ही स्पर्धा निरमा विद्यापीठानं जिंकली आहे. या स्पर्धेत पुण्यातील पिंपरी-चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालय, प्रथम उपविजेते, तर एमआयटी विश्वशांती विद्यापीठानं दुसऱ्या उप-विजेतेपदावर आपली मोहोर उमटवली.  दोन दिवस नवी दिल्लीतील त्यागराज मैदानावर या स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं. विजेता संघ आता व्हिएतनाममधील क्वांगनिन्ह इथं आंतरराष्ट्रीय आशिया-प्रशांत प्रसारण संघटनेच्या 2024 मध्ये भारताचं प्रतिनिधित्व करेल. 45 महाविद्यालयं, विविध शैक्षणिक संस्था आणि विद्यापीठांमधील 750 विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले होते.

**डिजिटलपेमेंट**

2030 पर्यंत भारतातल्या किरकोळ व्यापार क्षेत्रातल्या डिजिटल पेमेंटसची रक्कम दुप्पट म्हणजेच 7 लाख कोटी डॉलर्सवर जाण्याची शक्यता आहे. ऍमेझॉन पे आणि केर्ने या संस्थांच्या संयुक्त अभ्यासात असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. 2030 पर्यंत भारतातल्या इ कॉमर्स बाजारपेठेत 21 टक्क्यांनी वाढ होईल असं या अभ्यास अहवालात म्हटलं आहे.

या अहवालानुसार 2022 मध्ये एकट्या भारतातले डिजिटल आर्थिक व्यवहार संपूर्ण जगाच्या डिजिटल आर्थिक व्यवहारांच्या 46 टक्के इतके आहेत.

**पुनर्परीक्षा**
विद्यापीठ प्रवेशासाठीची सामायिक परीक्षा पुन्हा देऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची पुनर्परीक्षा 19 जुलै रोजी होणार असल्याचं राष्ट्रीय परीक्षा संस्था अर्थात एनटीए नं कळवलं आहे. इच्छुक विद्यार्थ्यांना इ मेल द्वारे त्यांच्या विषयांचे संकेत क्रमांक कळवण्यात आले आहेत. लवकरच विद्यार्थ्यांना परीक्षेची प्रवेशपत्रं पाठवली जातील. परीक्षेनंतर विद्यार्थ्यांनी पाठवलेल्या शंकांची संख्या लक्षात घेऊन उत्तरसूचीही लवकरच अधिकृत संकेतस्थळावर प्रकाशित केली जाईल असं एनटीए नं सांगितलं.

**रत्नभंडार**
ओडिशामध्ये पुरी इथल्या भगवान जगन्नाथाच्या मंदिरातल्या रत्नभांडाराचे सर्व दरवाजे काल उघडण्यात आले. राज्य सरकारनं जारी केलेल्या प्रमाणित कार्यपद्धतीनुसार रत्नभांडार खुलं करण्याची प्रक्रिया सुरू झाली असून या संपूर्ण प्रक्रियेचं ध्वनीचित्रमुद्रण करण्यात येत आहे. या प्रक्रियेत मोजदाद केलेल्या दागिन्यांच्या पेट्या ठेवण्यासाठी कडक सुरक्षेसह तात्पुरता विशेष कक्ष उभारण्यात आला आहे. 12 व्या शतकातल्या जगन्नाथ मंदिराच्या रत्नभांडारात हिरे, सोनं आणि मौल्यवान रत्नांचे दुर्मिळ दागिने आहेत. या सर्वांची तपशीलवार नोंदणी करण्यात येणार आहे. याआधी 1985 मध्ये हे रत्नभांडार उघडण्यात आलं होतं. तर इथल्या मौल्यवान जडजवाहिरांची गणना 1978 मध्ये करण्यात आली होती.

**क्रिकेट-टी-ट्वेंटी**
भारत आणि झिम्बाब्वे पुरुष संघातली 20 षटकांच्या क्रिकेट सामन्यांची मालिका भारतानं 4-1 नं जिंकली. काल झालेल्या पाचव्या आणि अंतिम सामन्यात भारतानं झिम्बाब्वेच्या संघावर 42 धावांनी विजय मिळवला. संजू सॅम्सनचं अर्धशतक आणि मुकेश कुमारचे 4 बळी यांनी भारताच्या विजयाला आकार दिला.

**विम्बल्डन**

विम्बल्डन टेनिस स्पर्धेत पुरुष एकेरीचं विजेतेपद स्पेनच्या कार्लोस अल्काराझनं पटकावलं. अंतिम फेरीत त्यानं सर्बियाच्या नोवाक जोकोविचचा 6-2,6-2,7-6 असा सरळ सेटसमध्ये पराभव केला. अल्काराझनं पहिले दोन्ही सेट 6-2 असे घेतल्यानंतर तिसऱ्या सेटमध्ये जोकोविचनं आपल्या चिवट प्रतिकाराचा प्रत्यय देत तिसरा सेट बरोबरीत आणला. मात्र टाय ब्रेकरमध्ये अल्काराझनं जोकोविचवर विजय मिळवला. अल्काराझचं हे सलग दुसरं विम्बल्डन विजेतेपद आहे.

**पाऊस**

महाराष्ट्राच्या बहुतांश भागात कालही पावसाची संततधार सुरू होती. रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, आणि पालघर जिल्ह्यात मुसळधार पावसानं जनजीवन विस्कळीत झालं आहे. कोकण रेल्वेमार्गावर दिवाणखवटी आणि विन्हेरे या स्थानकांदरम्यान काल दरड कोसळल्यामुळे कोकण रेल्वेच्या अनेक गाड्यांच्या वेळा बदलण्यात आल्या असून, अनेक गाड्यांचे मार्ग बदलण्यात आले आहेत, तर काही गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. मुंबईकडे जाणाऱ्या तेजस एक्सप्रेस, जनशताब्दी एक्स्प्रेस या गाड्या रत्नागिरी स्थानकात सायंकाळी थांबवण्यात आल्या.  रत्नागिरी आणि रायगड जिल्ह्यातल्या सर्व शाळा-महाविद्यालयांना आज सुटी जाहीर करण्यात आली आहे.

चिपळूणमध्ये एनडीआरएफची एक तुकडी सज्ज असून, खेडमध्ये येण्यासाठी एनडीआरएफची एक तुकडी संध्याकाळी पुण्यातून रवाना झाली.जगबुडी नदीला पूर आल्यामुळं खेडमधल्या अनेकांना स्थलांतरित करण्यात आलं आहे. चिपळूणची वाशिष्ठी नदी, राजापुरातली कोदवली आणि लांज्यातली मुचकुंदी या नद्या इशारा पातळीच्या वरून वाहत आहेत. मंडणगड तालुक्यातल्या भारजा नदीला पूर आला असून, चिंचघर-मांदिवली पुलावरून पाणी जात असल्यानं  वाहतूक बंद करण्यात आली आहे, अतिवृष्टीचा सर्वाधिक तडाखा खेड तालुक्याला बसला असून  सर्व नागरिकांना सतर्क राहण्याचा इशारा देण्यात आला आहे.

सिंधुदुर्ग आणि जिल्ह्यातही नद्यांनी इशारा पातळी ओलांडली असून काही ठिकाणची वाहतूक बंद पडली आहे.रायगड जिल्ह्यात आज महाड, माणगाव, पोलादपूर तालुक्यातील शाळांना जिल्हाधिकाऱ्यांनी सुटी जाहीर केली आहे.नाशिक शहरासह जिल्ह्यात पावसाचा

जोर कालही कायम होता. अंजनेरी इथं सहलीला गेलेली मुलं  जोरदार पावसामुळं अडकली होती. वनखात्यानं त्यांची सुखरूप सुटका केली.पुणे शहर आणि जिल्ह्यात काल दमदार पाऊस झाला.  या पावसानं खडकवासला धरण साखळीतील पाणी साठयात वाढ झाली आहे.

कोकणात आज अति मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. मध्य महाराष्ट्राचा घाट प्रदेश तर मराठवाडा आणि विदर्भात जोराचे वारे आणि विजांसह जोरदार ते अति जोरदार पाऊस पडेल.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार**